# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 16 मार्च 2025 | पान- 1


# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना 'संत तुकाराम पुरस्कार'

## बीजोत्सव त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्याची रविवारी सांगता

**पिंपरी | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन सोहळा बीजोत्सव त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्याची सांगता आणि ३७६वा बीज सोहळा हरिनामाच्या गजरात येत्या रविवारी (१६ रोजी) देहूत साजरा होत आहे.

यानिमित्त राज्यभरातून वारकरी, भाविक, फडकरी आणि संपूर्ण राज्यात ठिकठिकाणी झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील मान्यवर या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी देहू देवस्थानचे विश्वस्त मानक महाराज मोरे, संजय महाराज मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



रविवार (१६ रोजी) बीज सोहळादिनी श्रीक्षेत्र देहूत विविध धार्मिक कार्यक्रम प्रथा-परंपरांचे पालन करीत होणार आहेत. यामध्ये पहाटे तीन वाजता काकडा, पहाटे चार वाजता देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांच्या हस्ते 'श्रीं'ची पूजा, शिळामंदिर महापूजा वंशज (देहू) व वारकरी यांच्या हस्ते होईल. पहाटे सहा वाजता वैकुंठगमनस्थान येथे पूजा, सकाळी साडेदहा वाजता 'श्रीं'ची पालखी वैकुंठगमनस्थानाकडे हरिनामाच्या गजरात मार्गस्थ होईल. पहाटे मंदिरात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज, श्री विठ्ठल-रुक्मिणीमाता यांची अभिषेक पूजा होणार आहे. त्यानंतर 'श्रीं'ची पालखी मुख्य मंदिरातून सदेह वैकुंठगमनस्थानी हरिनामाच्या गजरात निघेल. सकाळी १० ते १२ या वेळेत बीज सोहळा होत आहे. यात ह.भ.प. महाराज मोरे देहूकर यांचे बीज सोहळ्यावर आधारित कीर्तन होईल.

### उपमुख्यमंत्र्यांचा होणार गौरव!

» संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने दर पंचवीस वर्षांनी वारकरी संप्रदायात योगदान देणाऱ्या समाजातील व्यक्तींचा जगद्गुरू संत तुकाराम महाराज पुरस्कार देवून गौरव करण्यात येतो. यंदा संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याची ३७५ वर्ष पूर्ण होत आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संत तुकाराम पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे.रविवारी (ता. १६) बीज सोहळ्यापूर्वी सकाळी साडेन वाजता वैकुंठगमनस्थान येथील मंदिरासमोरील मंडपात हा पुरस्कार संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने देण्यात येणार आहे. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, टाळ, चिपळ्या, विणा, गाथा आणि संत तुकाराम महाराजांची पगडी असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

नगरपंचायत कार्यालयामध्ये नियंत्रण कक्ष उभारले आहे. ठिकठिकाणी दिशादर्शक फलक, तसेच स्वच्छतागृह, हिरकणी कक्ष, पाण्याचे टँकर आदी विषयांची माहिती असलेले क्यूआर कोडसह स्थानदर्शक नकाशाही उभारण्यात आला आहे. स्वच्छतागृह उभारण्यात आले आहेत, १२ वेगवेगळ्या ठिकाणी पाण्याचे टँकर भक्तनिवास येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाह्यरुग्ण तपासणी शेजारी हिरकणी कक्ष आहे. गावठाण परिसर स्वच्छता सुरू असून इंद्रायणी नदीघाट, मुख्य मंदिर परिसर व रिंगरोड परिसर स्वच्छतेसाठी अतिरिक्त मनुष्यबळ आहे.


# थकबाकीदारांच्या 16 हजार 265 मालमत्ता सील

## निवासी व बिगरनिवासी अशा एकूण 1051 मालमत्ता जप्त : महापालिकेकडून कारवाई मोहीम तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

मार्चअखेर जवळ येत असल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याची कारवाई तीव्र केली आहे. आतापर्यंत तब्बल १६ हजार २६५ थकबाकीदारांच्या मालमत्ता सील केल्या आहेत. निवासी व बिगरनिवासी अशा एकूण १०५१ मालमत्ता जप्त केल्या आहेत. कारवाईच्या वेळेस थकबाकीसह संपूर्ण मालमत्ताकराचा भरणा केल्याने १५ हजार २१४ मालमत्तांवर कारवाई केली गेली नाही.

कर संकलन विभागास एक हजार कोटी रुपये वसुलीचे २०२४-२५ या आर्थिक वर्षांत उद्दिष्ट आहे. मार्च महिना संपण्यास केवळ १९ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे थकबाकीदारांवर कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. आतापर्यंत तब्बल १६ हजार २६५ थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्यात आल्या आहेत.



कारवाईच्या वेळेस एकूण १५ हजार २१४ मालमत्ताधारकांनी संपूर्ण बिल भरल्याने कारवाई करण्यात आली नाही. त्यांच्याकडून एकूण १३८ कोटी ४१ लाख ७२ हजार ५७३ रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. १०५१ मालमत्ताधारकांनी कारवाईच्या वेळेस बिल न भरल्याने त्या मालमत्ता सील करून जप्त केल्या आहेत. या थकबाकीदारांकडून एकूण २६ कोटी ५५ लाख ३१ हजार ३१८ रुपये असा थकीत कर येणे बाकी आहे.

> कारवाईची वाट न पाहता थकबाकीदारांनी संपूर्ण थकीत मालमत्ताकर एकरकमी भरून महापालिकेस सहकार्य करावे. कर संकलन विभागाने वसुली मोहीम अधिक तीव्र केली आहे. संपूर्ण बिलाचा भरणा केल्याशिवाय मालमत्तेस लावलेले सील काढले जात नाही. जप्त केलेल्या मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरू केली आहे.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, कर संकलन विभाग.**

कर संकलन विभागाच्या विविध १८ पथकांनी थकबाकीदारांच्या एकूण ४०७ मालमत्तांवर कारवाई केली. त्यातील ४०४ थकबाकीदारांनी कारवाईच्या वेळेस थकीत बिलाचा भरणा केला. ती रक्कम एकूण ३ कोटी ११ लाख ५९ हजार ७४८ रुपये इतकी आहे. त्यामुळे त्या थकबाकीदारांवर मालमत्ता सीलची कारवाई केली नाही, तर ३ जणांनी बिलाचा भरणा न केल्याने त्यांच्या मालमत्ता सील केल्या आहेत. त्यांच्याकडून एकूण २ लाख ५९ हजार ४९३ रुपयांची थकबाकी आहे.

# धुळवडीच्या दिवशी 400 मद्यपी जाळ्यात

## 6 हजार 118 वाहनांसंदर्भात गुन्हे दाखल : 50 लाख 94 हजार रुपयांचा दंड

**पुणे | प्रतिनिधी**

धुळवडीच्या दिवशी मद्यपी वाहनचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी वेगवेगळ्या भागात नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत ४०० मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन ३८६ वाहने जप्त करण्यात आली. वाहतूक नियमभंग केल्याप्रकरणी सहा हजार ११८ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन ५० लाख ९४ हजारांचा दंड वसूल केला.



धुळवडीच्या दिवशी मद्य पिऊन वाहने चालविणाऱ्या चालकांविरुद्ध कारवाईचा इशारा देण्यात आला होता. मद्य पिऊन वाहने चालविण्यात आल्याने गंभीर स्वरुपाचे अपघात घडतात. यापार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात नाकाबंदी करुन मद्यपी वाहनचालकांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. गुरुवारी (१३ मार्च) मध्यरात्रीपासून शहराच्या वेगवेगळ्या भागात, तसेच प्रमुख रस्त्यांवर लोखंडी कठडे उभे करुन नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली. शुक्रवारी मध्यरात्रीपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात आली, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.

पोलिसांनी ९० ठिकाणी नाकाबंदी करून आठ हजार ५५२ वाहनचालकांची तपासणी केली. ब्रीथ ॲनलायजर यंत्राद्वारे मद्यपी वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. तपासणीत ४०२ वाहनचालकांनी मद्य पिऊन वाहने चालविल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध खटले दाखल केले. शहरातील ३७ वाहतूक विभागातील पोलीस कर्मचारी नाकाबंदी कारवाईत सहभागी झाले होते. वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. भरधाव वेगाने वाहन चालविणे, दुचाकीवरुन 'ट्रिपल सीट' प्रवास करणे, विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. पोलिसांनी ३८६ वाहने जप्त केली. वाहतूक नियमभंग केल्याप्रकरणी सहा हजार ११८ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन ५० लाख ९४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला, असे पोलीस उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

### पोलिसांची कारवाई

- मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई – ४०२
- दुचाकीवरुन ट्रिपल सीट प्रवास – ९२१
- विरुद्ध दिशेने वाहन चालविणे – ८५२
- एकुण कारवाई – सहा हजार ११८
- दंड – ५० लाख ९४ हजार

### 90 ठिकाणी नाकाबंदी


» होळी, धुळवडीच्या दिवशी वाहनचालक मद्य पिऊन वाहने चालवितात. भरधाव वाहन चालविण्यात येत असल्याने गंभीर स्वरुपाचे अपघात घडतात. अपघाताच्या घटना रोखणे, तसेच मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांनी ९० ठिकाणी नाकाबंदी करुन मद्यपी वाहनचालक, तसेच नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई केली, असे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी सांगितले.

# जलवाहिन्यांची तपासणी देखील 'रोबो'द्वारे होणार!

## शहरातील जुन्या जलवाहिन्यांची तपासणी 'रोबो'च्या माध्यमातून करण्याचा महापालिकेचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील जुन्या जलवाहिन्यांची तपासणी 'रोबो'च्या माध्यमातून करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. सांगली-कुपवाड महापालिकेकडून पहिल्यांदा अशी तपासणी करण्यात आली होती. हा प्रयोग पुण्यात राबविण्याचा प्रयत्न महापालिकेने सुरू केला आहे. शहरातील मध्यवर्ती भागांमध्ये अनेक जुन्या जलवाहिन्या आहेत. त्यांची फारशी माहिती महापालिकेला नाही. या वाहिन्या जीर्ण झाल्याने त्यात गळती होते. यामध्ये नक्की काय दोष आहे, यासाठी महापालिकेला संपूर्ण रस्ता खोदावा लागतो. यामुळे अनेकदा वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागतो.



या नवीन तंत्रज्ञानामुळे रोबोवर अत्याधुनिक कॅमेरे असणार आहेत. यामुळे जलवाहिनीमध्ये होणारी गळती, अनधिकृत, अधिकृत नळजोड, जलवाहिनी आतमध्ये खराब झाली आहे का, याची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभागाला मिळणार आहे. शहरातील १०० मिलीमीटर व्यासापेक्षा मोठ्या आकाराच्या जलवाहिन्यांची तपासणी या माध्यमातून होणार आहे. शहरातील अनेक जलवाहिन्या ४० वर्षे जुन्या आहेत. त्या आतमध्ये सडल्याने फुटतात. त्यामध्ये दूषित पाणी, कचरा मिसळतो. वारंवार दुरुस्तीनंतरही अनेक जलवाहिन्यांमध्ये गळती थांबत नाही. त्यामुळे त्यांची तपासणी करण्याची मागणी केली जात होती. सांगली कुपवाड महापालिकेकडून अशा प्रकारे जलवाहिनी तपासणी केली जात असल्याचेही समोर आल्यानंतर पुणे महापालिकेने प्रायोगिक तत्त्वावर या रोबोचा वापर सुरू केला आहे.

पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले की, रोबोच्या माध्यमातून जलवाहिन्यांची अंतर्गत तपासणी केली जाते. त्याचे फोटो, व्हिडिओ उपलब्ध होतात. सध्या दोन ठिकाणी प्रायोगिक स्वरूपात ही तपासणी केली जात आहे. रोबोची कायमस्वरूपी खरेदी किंवा भाडेतत्त्वावर वापर याचा निर्णय घेतला जाईल.

**दोन भागात काम सुरू**

जुन्या जलवाहिन्यांची रोबोटच्या साह्याने तपासणी करण्याचे काम सध्या शहरातील दोन भागात सुरू आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या कामाचे सकारात्मक निकाल महापालिकेला मिळत आहे. त्यामुळे याच माध्यमातून जलवाहिन्या दुरुस्त करण्याचा महापालिकेचा प्रयत्न राहणार आहे. रोबोटच्या वापरामुळे जलवाहिन्या होताना होणारा त्रासही कमी होणार आहे.

### अशी होते तपासणी

» या यंत्रणेमार्फत सध्या कसबा पेठ, वडगाव भागातील जलवाहिन्यांची तपासणी केली जात आहे. जलवाहिनीला मध्यभागी छेद घेऊन त्यामध्ये रोबोट सोडला जातो. जलवाहिनीच्या आतमध्ये दोन्ही बाजूंना सुमारे १८० मीटर लांबीपर्यंत हा रोबो जातो. यामध्ये प्रकाशासाठी सुविधा, ३६० अंशात फिरणारा कॅमेरा लावलेला असतो. यामधून आवश्यकतेनुसार चित्रीकरण केले जाते, फोटो काढले जातात.

# पालिका एक हजार कोटींचा टप्पा गाठणार का?

## मालमत्ता करातून 17 दिवसांत 165 कोटी वसुलीचे टार्गेट - विभागासमोर मोठे आव्हान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाला चालू २०२४-२५ या आर्थिक वर्षात एक हजार कोटी वसुलीचे उद्दिष्ट दिलेले आहे. विभागाकडून आज अखेर ८३५ कोटी रुपयांचा मालमत्ताकर वसूल झाला आहे. मात्र, उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी फक्त १७ दिवस उरले असून १६५ कोटी रुपये वसूल करण्याचे आव्हान विभागासमोर आहे. त्यामुळे वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करून महापालिका एक हजार कोटी रुपयांचा मालमत्ता कर मिळवणार का, हे पाहावे लागणार आहे.

कर संकलन विभागाने मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करून त्या सील करण्याची कारवाई तीव्र केली आहे. प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांची नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्या मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. थकबाकीदार कंपन्या, कारखाने, शॉपिंग मॉल, पेट्रोल पंप, रूग्णालय, शाळा, महाविद्यालय, बांधकाम व्यावसायिक, हॉटेल तसेच, निवासी मालमत्ता सील केल्या आहेत.

कारवाईनंतर थकबाकीदार बिल भरत आहेत. त्या मालमत्तेचे सील काढण्यात येत आहे. तसेच, ५० हजार व त्या पेक्षा अधिक थकबाकी असलेल्या निवासी व बिगरनिवासी मालमत्तांकडून वसुली मोहीम तीव्र करण्यात आली आहे. तसेच, नळजोडही खंडित करण्यात आले आहेत. एसएमएस आणि फोन करून थकबाकीदारांना बिल भरण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. त्याला काही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत आहे.

आत्तापर्यंत एकूण ५ लाख ४ हजार ९०० मालमत्ताधारकांनी एकूण ८३५ कोटी ८१ लाख रूपयांचा भरणा केला आहे. कर संकलन विभागास १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षात १ हजार कोटी रूपये वसुलीचे उद्दिष्ट दिलेले आहे. त्यामुळे उर्वरित १७ दिवसांत करसंकलन विभागास तब्बल १६५ कोटी रूपयांची वसुली करावी लागणार आहे. त्यासाठी मार्च महिन्यातील अखेरच्या काही दिवसांत महापालिका करसंकलन विभागाकडून वसुली व कारवाई मोहिम तीव्र केली जाणार आहे.




### वाकडमधून सर्वाधिक, तर पिंपरीत सर्वात कमी भरणा

» वाकड विभागीय कार्यालयात सर्वाधिक ६७ हजार २६१ मालमत्ताधारकांनी सर्वाधिक ११४ कोटी ३५ लाख रूपयांचा भरणा केला. त्यापाठोपाठ थेरगाव ७४ कोटी ६२ लाख, चिखली ७२ कोटी ५६ लाख, भोसरीत ५८ कोटी २ लाख, सांगवी ५४ कोटी ६८ लाख, चिंचवड ५३ कोटी १४ लाख, पिंपरी गावात ४९ कोटी ७५ लाख, किवळेत ४८ कोटी ९६ लाख, मोशीत ४८ कोटी ४ लाख, आकुर्डीत ३९ कोटी ६७ लाख, महापालिका भवन ३८ कोटी ८६ लाख, कस्पटे वस्ती ३६ कोटी ७९ लाख, फुगेवाडी, दापोडी- २६ कोटी ३९ लाख, चऱ्होली- २५ कोटी ६ लाख, दिघी, बोपखेलमध्ये २५ कोटी २१ लाख रूपयांचा कराचा भरणा झाला आहे. सर्वांत कमी तळवडेत २१ कोटी ४२ लाख, निगडी-प्राधिकरणात १८ कोटी २१ लाख आणि पिंपरी कॅम्पात ७ कोटी ११ लाख रूपयांचा भरणा झाला आहे.

### कर वसुलीची सद्यस्थिती

- » एकूण मालमत्ताधारक- ६ लाख ३५ हजार
- » कर भरणारे – ५ लाख ४ हजार ३८८
- » जमा कर – ८३५ कोटी ८१ लाख
- » कर न भरणारे – १ लाख ३० हजार ६१२

“ चालू मालमत्ता कर व थकबाकी वसुलीसाठी जनजागृती, तसेच कारवाई मोहिमा राबवून प्रयत्न करण्यात येत आहे. आर्थिक वर्षाअखेरीस अधिकचा भरणा होऊन जास्तीत जास्त मालमत्ता कर वसूल होईल. थकबाकीदारांनी भरणा न केल्यास त्यांच्या मालमत्ता जप्तीची कारवाई प्रस्तावित आहे.

**- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# बालवाडीच्या मुलांचा पाया होणार भक्कम

## विविध उपक्रमांमुळे शिक्षणात सुसूत्रता - 50 शिक्षकांचा संघ घेतोय मेहनत

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या बालवाड्यांमध्ये शिक्षणाचा अनुभव अधिक प्रभावी आणि समृद्ध करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये शिक्षिकांनी बनवलेली हस्तपुस्तिका, बालवाडी शिक्षिकांसाठी विशेष कार्यशाळा, मास्टर ट्रेनर निवड आणि क्लस्टर मिटिंग्सच्या माध्यमातून बालवाडी शिक्षणात एकसूत्रता आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. त्यामुळे बालवाडीतील मुलांच्या शिक्षणात प्रगती होऊन त्यांचा पाया भक्कम होणार आहे.

बालवाडी वर्गांसाठी शिक्षिकांनी शिक्षिकांसाठी बनवलेली हस्तपुस्तिका हा महत्वाकांक्षी उपक्रम ठरत आहे. दोन वर्षांपूर्वी बालवाडी समन्वयकांशी चर्चा करून शिक्षिकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये तीन विभागांमधून ५० शिक्षिकांचा संघ तयार झाला. विविध संस्थांच्या आणि अभ्यासक्रमांच्या मदतीने बालवाडी शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी या शिक्षिकांनी प्रयत्न सुरू केले आहेत. प्रत्येक महिन्यात बालकांच्या शारीरिक, भाषा, गणनपूर्व आणि सामाजिक भावनिक विकासासाठी कार्यशाळा घेतल्या जातात. या कार्यशाळांमध्ये शिक्षिकांना प्रत्यक्ष डेमोद्वारे प्रशिक्षण दिले जाते. गेल्या दोन वर्षांपासून दरमहा तीन तासांच्या कार्यशाळांमुळे बालकांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

महापालिकेसोबत कार्य करणाऱ्या संस्था आणि आकांक्षा फाउंडेशनच्या अभ्यासक्रम टीमसोबत चर्चा करून या शिक्षिकांनी एक विशेष हस्तपुस्तिका तयार केली. ही हस्तपुस्तिका सर्व शिक्षिकांना वितरित करण्यात आली. तिच्या आधारे प्रत्येक बालवाडी वर्गात एकसारखा अभ्यासक्रम राबवण्यात येत आहे. या माध्यमातून शिक्षणात सुसूत्रतता येत आहे.



### मास्टर ट्रेनर व समन्वयकांचा सहभाग

» बालवाड्यांमधील सर्व शिक्षिकांपर्यंत हे ज्ञान पोहोचावे म्हणून ८ विभागांमधून प्रत्येकी २ अशा १६ मास्टर ट्रेनर्सची निवड करण्यात आली आहे. त्यांच्याद्वारे शिक्षकांना प्रशिक्षण घेऊन ८ क्लस्टर मिटिंग्स सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये समन्वयकांचा सहभाग असून विविध शाळांच्या भेटी देऊन शिक्षिकांना सहकार्य आणि बालकांना शैक्षणिक योजनांचा लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

“ हस्तपुस्तिका, कार्यशाळा, मास्टर ट्रेनर्सची निवड, क्लस्टर मिटींग्स, समन्वयकांची निवड अशा विविध उपक्रमांद्वारे बालवाडीमधील शिक्षिकांना मदत होत असून बालकांना एकसंध, दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण मिळत आहे. आपण सर्व एकमेकांसाठी एकत्र या तत्त्वावर आधारित हा उपक्रम भविष्यातही अधिक प्रभावीपणे राबवण्याचा महापालिकेचा संकल्प आहे.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त., पिंपरी-चिंचवड महापालिका**

# शेवाळेवाडी बसडेपो असुविधांचे आगार!

## पाणी, स्वच्छतागृहांसह विविध सुविधांचा अभाव; प्रवाशांच्या सुरक्षेकडेही पीएमपी प्रशासनाचे दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

शेवाळेवाडी येथील पीएमपी बसडेपोची सध्या दुरवस्था झाली आहे. बंद असलेले पथदिवे, अडगळीत उभ्या केलेल्या बस, परिसरात वाढलेले गवत आणि झाडेझुडपे, ठिकठिकाणी पडलेल्या दारूच्या बाटल्या, असे चित्र सध्या या ठिकाणी दिसून येत आहे. स्वच्छतागृह आणि पाणीपुरवठ्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे कर्मचाऱ्यांसह प्रवाशांनाही कुचंबणेला सामोरे जावे लागत आहे.



स्वारगेट एसटी आगारातील बलात्कार प्रकरणामुळे बसस्थानकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर सावली फाउंडेशनचे अध्यक्ष, माजी नगरसेवक योगेश ससाणे आणि नागरिकांनी शेवाळेवाडी पीएमपी बसडेपोची नुकतीच पाहणी केली. त्या वेळी त्यांना काही पथदिवे बंद असल्याने ठिकठिकाणी आंधाराचे साम्राज्य असल्याचे दिसून आले. अनेक मुक्कामाच्या बसचे दरवाजे उघडे असल्याचे दिसून आले.

सध्या शेवाळेवाडी डेपो विविध समस्यांचो आगार बनले आहे. मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांसाठी कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. आगारात केवळ पाच हायमास्ट दिव्यांचे खांब आहेत. मात्र, ते सर्व बंद अवस्थेत आहेत.

स्वच्छतागृहांची देखील दुरवस्था झाली आहे. बंद पडलेल्या बस आवारात उभ्या करून ठेवण्यात आल्या आहेत. ठिकठिकाणी दारूच्या रिकाम्या बाटल्या पडल्याचे दिसून आले. कर्मचारी आणि प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही नसल्याचे ससाणे यांनी सांगितले.

शेवाळेवाडी डेपोतून दररोज सुमारे 7 ते 8 हजार प्रवासी ये-जा करत असतात. मात्र, या ठिकाणी त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. पाण्यासाठी केवळ दोन हजार लिटरची एकच टाकी असून, हे पाणी अपुरे पडत आहे. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसाठी केवळ एकच स्वच्छतागृह असून, त्याचीही दुरवस्था झाली आहे. यामुळे विशेषत: महिला प्रवाशांची कुचंबणा होत आहे परिसरात वाढलेले गवत आणि झाडेझुडपे, ठिकठिकाणी पडलेल्या दारूच्या बाटल्या, असे चित्र सध्या या ठिकाणी दिसून येत आहे. स्वच्छतागृह आणि पाणीपुरवठ्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे कर्मचाऱ्यांसह प्रवाशांनाही कुचंबणेला सामोरे जावे लागत आहे..

रात्रीच्या वेळेस येथे एकच सुरक्षा रक्षक असून, येथे नादुरुस्त बसमध्ये रात्रीच्या वेळी काही गैरप्रकार घडला तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. कर्मचारी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी बसडेपोमध्ये तातडीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

> स्वारगेट बसस्थानकानीत अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शेवाळेवाडी पीएमपी बसडेपाची नुकतीच रात्री आणि दिवसा पाहणी करण्यात आली. या वेळी प्रवाशांच्या सुरक्षेसाठी या ठिकाणी पुरेसे सुरक्षारक्षक नसल्याचे निदर्शनास आले. तसेच स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, पथदिवे आदी सुविधांचाही परिसरात आभाव असल्याचे दिसून आले. पीएमपी प्रशासनाने तातडीने डेपोतील असुविधांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
>
> **- योगेश ससाणे, अध्यक्ष, सावली फाउंडेशन**

> डेपोची मागील जागा खासगी ठेकेदाराकडे असून, त्यांच्या बस त्या ठिकाणी उभ्या केल्या जातात. आरटीओ कार्यालयाने केलेल्या कारवाईतील काही बस या ठिकाणी उभ्या केल्या आहेत. हायमास्ट दिवे दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहेत. पाण्यासाठी मोठी टाकी नसल्याने कर्मचारी आणि प्रवाशांसाठी पाणी कमी पडत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी मांजरी बुद्रुक पाणी योजनेतून दोन नळजोड घेतले असून, साठवण टाकीचे देखील नियोजन केले आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.
>
> **- गुलाब गायकवाड, आगारप्रमुख, मांजरी-शेवाळेवाडी बसडेपो**

# पुणे जिल्ह्यात साडेचार लाख 'फार्मर आयडी' तयार

## ॲग्रीस्टॅक' योजना राज्यभर लागू करण्यात आली आहे, तर राज्यात 78 लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' तयार केले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

'ॲग्रीस्टॅक' योजना राज्यभर लागू करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील साडेचार लाख शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' तयार करण्यात आले आहे, तर राज्यात 78 लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' तयार केले आहेत.




अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांने आघाडी घेतली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी 'ॲग्रीस्टॅक'द्वारे 'फार्मर आयडी' तयार करण्यापासून, ते बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांचा आधार क्रमांक, बँकेचे खाते क्रमांक आणि शेतीसह शेतीतील पिकांची माहिती एकत्रित असणार आहे.

'ॲग्रीस्टॅक' योजनेचे काम तलाठी तसेच कृषी सहायकावर सोपविण्यात आले होते. मात्र, त्यांनी योग्य मोबदला मिळत नसल्याचे सांगत कृषी सहायकांनी कामावर बहिष्कार घातला होता. त्यामुळे पुण्यासह अन्य जिल्ह्यांमध्ये फार्मर आयडी तयार करण्याचे काम रखडले होते.

पुणे जिल्ह्यात कृषी सहायकांनी फार्मर आयडी तयार करण्याचे पुन्हा सुरू करावे यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी वारंवार कृषी विभागाच्या बैठका घेतल्या होत्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून 'फार्मर आयडी' तयार करण्यास सुरुवात आले आहे.

पुणे जिल्ह्यात 14 लाख 53 हजार 297 इतक्या शेतकऱ्यांची नोंद आहे. त्यापैकी पुणे जिल्ह्यात आतापर्यंत चार लाख 49 हजार 525 इतक्या शेतकऱ्यांनी 'फार्मर आयडी' तयार केले आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांनी दिली.

### अहिल्यानगर अग्रक्रमावर

» राज्यात आतापर्यंत 78 लाख 14 हजार 720 इतक्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करण्यात आले आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वाधिक पाच लाख 14 हजार 921 तसेच नाशिक जिल्ह्यातून चार लाख 55 हजार 759 इतक्या शेतकऱ्यांनी आयडी तयार केल्याने अनुक्रमे पहिला, दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले आहेत.

> पुणे जिल्ह्यात उर्वरित दहा लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे आयडी तयार करण्याचे काम बाकी आहे. आयडी तयार करण्यामध्ये 'पीएम किसान योजने'चे लाभार्थी असलेल्या शेतकऱ्यांचे प्राधान्याने फार्मर आयडी तयार करण्याचे काम सुरू आहे.
>
> **- नामदेव टिळेकर, उपजिल्हाधिकारी, कूळ कायदा शाखा जिल्हा**